# दि आष्टा पीपल्स को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड, आष्टा.

## ६७ वी वार्षिक सर्व साधारण सभा नोटीस

(फक्त भागधारक सभासदांचे करीता)

**दि आष्टा पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड., आष्टा.** या बँकेच्या भागधारक सभासदांची ६७ वी वार्षिक सर्व साधारण सभा **रविवार दि.२०/०९/२०२६** रोजी सकाळी ठिक **१०.००** वाजता हेव्हन हॉल आष्टा-तासगांव रोड आष्टा येथे खालील विषयांचा विचार करणेसाठी भरणार आहे. तरी बँकेच्या सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे अशी नम्र विनंती.

**- सभेपुढील विषय-**

१) मागील दि.१४/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेच्या कामकाजाचे वृत्तांत वाचून कायम करणे.

२) मा.संचालक मंडळाचा अहवाल, वैधानिक लेखापरिक्षक यांचे कडून आलेला दि.३१ मार्च २०२६ या वर्षाअखेरचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.

३) मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२५-२०२६ चे नफ्याच्या विनियोगास मान्यता देणे.

४) सन २०२५-२०२६ या वर्षा अखेरील वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाची वाचून नोंद घेणे. व सन २०२४-२०२५ च्या लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरूस्तीस मान्यता देणे.

५) सन.२०२६-२७ करीता वैधानिक लेखापरिक्षकांच्या नेमणूकीबाबत रिझर्व्ह बँकेच्या निर्देशकानुसार केलेल्या नेमणुकीची नोंद घेणे व मान्यता देणे.

६) सन २०२७-२०२८ या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत हिशोब तपासणीस नेमणूकीस मंजुरी देणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

७) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठीचे खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे व सन २०२५-२०२६ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

८) मा.संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची वाचून नोंद घेणे.

९) बँकेने सन २०२५-२०२६ मध्ये इमारत,संगणक साठी केलेल्या गुंतवणूकीस मान्यता देणे.

१०) सन २०२६-२०२७ सालामध्ये कराव्या लागणा-या भांडवली गुंतवणूकीस (उदा. जागा, इमारत, फर्निचर, संगणक इ.) मंजूरी देणे.

११) एक रकमी कर्ज परत फेड व तडजोड़ योजने अंतर्गत वसुलीस सवलत देण्यात आलेल्या कर्ज खात्यांची नोंद घेवून त्यास मंजुरी देणे.

१२) मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयांचा विचार करणे.

मा.संचालक मंडळाचे आदेशावरून

ठिकाण- आष्टा
दिनांक - ०५-०९-२०२६

**मा.श्री.मारुती भिमाणण्णा मासाळ**
सहा. मुख्य कार्यकारी अधिकारी

**विशेष सुचना -**

१) अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व नोटीसीमधील इतर बाबीबाबत सभेमध्ये काही प्रश्न विचारावयाचे असल्यास सभासदांनी दि. १५/०९/२०२६ पुर्वी बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे लेखी विचारणा करावी.

२) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्धा तासानंतर चालू होईल. त्यास गणसंख्येची मर्यादा राहणार नाही.

३) सन २०२५-२६ चा वार्षिक अहवाल नजीकच्या शाखेत तसेच बँकेच्या www.ashtapeoples.bank.in या वेब साईटवर उपलब्ध आहे.

४) सर्व सन्माननीय सभासदांना बँकेच्या नजीकच्या शाखेमध्ये संपर्क साधून मोबाईल क्रमांक , ई-मेल आयडी,व्हॉटसअॅप सुविधा असलेल्या मोबाईल क्रमांकाचीच नोंद करावी म्हणजेच बँकेला संपर्क करणे सोयीचे होईल.

५) ज्या सभासदांना अहवाल मिळाला नाही त्यांनी नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा.